सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२५/1048
दिनांक :- 08 APR 2025

प्रति,
प्राचार्य,
सर्व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा २०२५ माहिती सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्याबाबत.**

**संदर्भः-** १. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/वक्तृत्व स्पर्धा/२०२५ दिनांक ०४/०४/२०२५.
२. मा. अध्यक्ष, केअर ऑफ पब्लिक सेफ्टी असोसिएशन (कॉप्स), महाराष्ट्र राज्य यांचा दि. २/४/२०२५ रोजीचा ई-मेल.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, केअर ऑफ पब्लिक सेफ्टी असोसिएशन (कॉप्स), महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेने महाराष्ट्रातील उच्च व तंत्रशिक्षण विभागातील विद्यार्थ्यांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना या विषयावर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२५ आयोजित केली असून स्पर्धेचे माहितीपत्रक विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याकरीता संदर्भ क्र. २ च्या ई-मेलव्दारे कळविलेले असून त्याची प्रत यासोबत जोडलेली आहे.

सबब आपल्या संस्थेमधील विद्यार्थ्यांना सोबत जोडलेल्या वक्तृत्व स्पर्धेची माहिती देऊन, सदर वक्तृत्व स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होण्याकरीता त्यांना प्रोत्साहित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

**( मनोज म. अंधारे )**
**प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

**प्रतः- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७५, ४६५, ४९२, ४४२, ४४३, ४४७
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक २/एनजीसी/वक्तृत्व स्पर्धा/२०२५

प्रति.
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर

**विषय : राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा 2025 माहिती सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्याबाबत....**

संदर्भ : अध्यक्ष, केअर ऑफ पब्लिक सेफ्टी असोसिएशन (कॉप्स), महाराष्ट्र राज्य यांचा दि.२.४.२०२५ रोजीचा ई-मेल

संदर्भांकित ई-मेलच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, केअर ऑफ पब्लिक सेफ्टी असोसिएशन (कॉप्स), महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेने महाराष्ट्रातील उच्च व तंत्रशिक्षण विभागातील विद्यार्थ्यांच्या समस्या व त्यावरील उपयायोजना या विषयावर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा २०२५ आयोजित केली असून स्पर्धेचे माहितीपत्रक विद्यार्थ्यांना उपलब्ध करू देण्याकरीता या कार्यालयास संदर्भीय ई-मेलव्दारे कळविले आहे.

सबब आपल्या विभागाच्या कार्यकक्षेतील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थामधील विद्यार्थ्यांना सोबत जोडलेल्या वक्तृत्व स्पर्धेची माहिती देऊन, विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी होणेबाबत, आपल्या स्तरावरून सर्व संस्थांना सूचित करण्यात यावे.

Signed by
Sunil Sukhadeo Bhamare
Date: 04-04-2025 17:01:36

(डॉ.सुनिल भामरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत : माहिती व कार्यवाहीकरीता.
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांचे प्रमुख.



Scanned with OKEN Scan

# COPS®

## CARE OF PUBLIC SAFETY ASSOCIATION


**Amar Ekad ( PRESIDENT Maharashtra State)**



TRUST REGD. UNDER ACT 1950 F-54875/PUNE, NGO REGD. UNDER ACT 1860-MH/1359/2019/PUNE
12A-UID-AAEAC4042KE20221, 80G - UID-AAEAC4042KF20231,
UDYAM MH-26-0066046, REGD. UNDER NITI AAYOG DARPAN NGO UID MH/2020/0268814
MINISTRY OF SOCIAL JUSTICE & EMPOWERMENT GOVT. OF INDIA UID MH/00024594


REF No.

DATE : 02-08-2025

## *राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा २०२५*

महाराष्ट्रातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातील विद्यार्थ्यांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा २०२५ आयोजन केले आहे.

आपल्यां भाषणाचा व्हिडीओ तयार करून व्हॉटसअॅपवर ९१३७९९२७९९ पाठवा.

**एकूण पारितोषिक ६०,०००/- रु. चषक व सन्मानपत्र दिले जाईल. प्रवेश फी फक्त - २०१/ रु.**

### नियम व अटी

१) स्पर्धा सर्व वयोगटातील मुला-मुलीसाठी खुली आहे.

२) आपल्या भाषणाचा व्हिडीओ कमीत कमी तीन व जास्तीत जास्त सहा मिनिटांचा असावा.

३) एका स्पर्धकाने एकच व्हिडीओ पाठवावा. व्हिडीओ कोणतीही Editing न करता पाठवावा. (Without any special effect).

४) भाषण मराठी, हिंदी व इंग्रजी यापैकी कोणत्याही एका भाषेत करू शकता. महाराष्ट्रातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातील विद्यार्थ्यांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना याविषयीचे आणि संलग्न विषयावरील भाषण गाह्य धरले जाईल.

५) परीक्षकांचे ८०% गुण व ऑनलाईन पसंतीचे २०% गुण यावरून स्पर्धक निवडले जातील.

६) स्पर्धेत सहभागी सर्वच स्पर्धकांना सहभागाचे ऑनलाईन प्रमाणपत्र मिळेल.

७) सर्व स्पर्धकांचे व्हिडीओ संपादित करून AMAR EKAD या You Tube Channel वर अपलोड होतील. स्पर्धेनंतरही हे व्हिडीओ युट्युबवर ऑनलाईन राहतील, जेणेकरून त्यांचा इतर विद्यार्थ्यांना फायदा होऊ शकेल व स्पर्धकांना प्रोत्साहन मिळेल.

८) अर्धवट माहिती, वादग्रस्त विधाने, शंकास्पद व्हिडीओ प्रथम फेरीत बाद केले जातील.

स्पर्धा संबधीचे सर्व अधिकार आयोजक समितीतील सदस्यांना आहेत.

**आयोजक**

**अमर अनिता जालिंदर एकाड अध्यक्ष, केअर ऑफ पब्लिक सेफ्टी असोसिएशन (कॉप्स).**

Care of Public Safety Association (COPS)

Amar

Authorised Signature


**Email Id :** copsassociationindia@gmail.com